!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४२० २२/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# गायीला राष्ट्रमाता घोषीत करा
# लोकसभेत खासदार चंद्रकांत खैरे यांची मागणी

**( संभाजीनगर दि.२१ ) :** हिंदुस्थानात जसे राष्ट्रपिता, राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज या क्रमाने भारतीय समाज रचनेचा पाया व केंद्रबिंदु असलेल्या गायीला राष्ट्रमातेचा दर्जा द्या अशी आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

गो-गंगा-गिता आणि गौरी यांचा उचित सन्मान करण्यासाठी देशात गंगा नदीच्या संरक्षणासाठी स्वतंत्र मंत्रालय, 'बेटी बचाव - बेटी पढाओ', गोवंश हत्याबंदीचे ऐतिहासिक निर्णय एनडीए सरकारने घेतले. मनुष्य जीवन गायीच्या दुधाशिवाय पुर्ण होऊ शकत नाही. तसेच गायीचे आपल्या संस्कृतीतील महत्वाची इतरांशी तुलना होऊ शकत नाही. देवी समान असलेली गोमाता ही गुणांची खाण आहे. याची जाणीव समाजातील प्रत्येक घटकाला आहे. त्यामुळे गायीला राष्ट्रमातेचा दर्जा देऊन सन्मान व संरक्षण देण्याची मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

गाय भारतीय समाज रचनेचा पाया व केंद्रबिंदु आहे. पण गोहत्येमुळे देशी गायी जवळ जवळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. गायीच्या शेकडो जाती पैकी आज केवळ ३३ प्रजाती शिल्लक राहिल्या आहेत. येणाऱ्या काळात गायींचे संरक्षण झाले नाही तर निसर्गाची अनमोल भेट नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे या चिंतनीय विषया बद्दल जनजागृती व्हावी यासाठीही शासनाने पावले उचलावीत अशी आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन/ गणेश वाघ

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मछली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525